


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**

स्वत: चा विकास करा.
ध्यानात ठेवा, गती आणि वाढ
हीच जिवंतपणाची लक्षणे आहेत.
-- स्वामी विवेकानंद

वर्ष : ०५ | अंक : ०३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.१८ ऑगस्ट २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

**पाहिजेत !!** राजेंद्र कुमार : ९४२२६७५१६४

एखादे कुटुंब हवे आहे, जे शेती काम करतील. माझ्या घरातील व शेतीवरील कामात caretaker म्हणून काम पाहतील.

**प्रथम पगार रुपये ८,०००/- ते रुपये १५,०००/- प्रतिमाह**
**एका मुलाचा शालेय शिक्षण खर्च समाविष्ट**

गाईचा गोठा सर्व कामे : दूध काढणे, चारा देणे, गोठ्यात इतर कामे...
शेतीवरील काम : शेतीवरील कामात लक्ष देणे, पाणी पंप सुरू करणे व शेताला पाणी पुरवठा करणे, माणसे काम करतील ते पाहणे व ईतर काही कामे.

**राहण्याची सोय आहे... ५ वर्षे करार असेल...**
**गाव : लोणविरे तालुका : सांगोला जिल्हा : सोलापूर**

## भाजपचं धक्कातंत्र, महाराष्ट्राचे राज्यपाल होणार देशाचे उपराष्ट्रपती?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, मुंबई :** नवी दिल्ली : उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीबाबत मोठी बातमी समोर येत आहे. उपराष्ट्रपतीच्या पदाच्या निवडणुकीसाठी एनडीएचा उमेदवार निश्चित झाल्याची माहिती समोर येत आहे. महाराष्ट्राचे सध्याचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची निवड उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी करण्यात आली आहे. भाजपचे सध्याच्या राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी पत्रकार परिषद घेऊन याबाबत मोठी घोषणा केली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून एनडीएकडून उपराष्ट्रपतीच्या पदाच्या निवडणुकीसाठी कुणाला उमेदवारी दिली जाईल? याबाबत सस्पेन्स होता. अखेर या सस्पेन्सवर पडदा पडला आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून उपराष्ट्रपती पदाचा उमेदवार कोण असेल? याबाबत सस्पेन्स होता. उपराष्ट्रपती पदाचा उमेदवार



ठरवण्यासाठी भाजपकडून जे. पी. नड्डा यांना महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली होती. उपराष्ट्रपतीपदासाठी अनेक नावांची चर्चा होती. पण जे नाव चर्चेतही नव्हतं असं नाव अधिकृत उमेदवार म्हणून जाहीर करण्यात आलं आहे. यातून भाजपने पुन्हा एकदा धक्कातंत्रचा अवलंब केल्याचं उघड झालं आहे.

**जे. पी. नड्डा नेमकं काय म्हणाले?**

उपराष्ट्रपतीच्या निवडणुकीसाठी उम ेदवार ठरवण्याबाबत एनडीची बैठक झाली. अनेकांच्या सूचना मागवण्यात आल्या. यानंतर महाराष्ट्राचे आमचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची उपराष्ट्रपती पदासाठी उमेदवार ठरवण्याचं आमचं निश्चित झालं, अशी माहिती जे. पी. नड्डा यांनी दिली.

**उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक बिनविरोध होणार?**

भाजप, मित्रपक्ष आणि एकंदरीत एनडीएकडून सर्व राजकीय पक्ष, विरोधी पक्ष, विरोधी पक्षनेते यांच्यासोबत आमच्या वरिष्ठ नेत्यांनी संपर्क साधला आहे. उपराष्ट्रपती पदासाठीची निवडणूक बिनविरोध व्हावी, सर्वांच्या सहमतीने निवडणूक व्हावी आणि भाजपचा उमेदवार असावा याबाबत आम्ही त्यांच्यासमोर मुद्दा मांडला आहे. विरोधी पक्षांनी उमेदवार कोण असेल ते पाहून आम्ही भाजपच्या उमेदवाराला पाठिंबा द्यायचा की नाही ते ठरवू असं सांगितलं आहे.

आमच्या एनडीएच्या सहकाऱ्यांसोबतही सविस्तर चर्चा झाली आणि त्यांनतर आम्ही ही खुशखबरी देत आहोत. संसदीय बोर्डाच्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली, अशी माहिती जे पी नड्डा यांनी दिली.

## पूरामुळे रस्त्याची दयनीय अवस्था, ग्रामस्थ त्रस्त !



**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.१७, किनवट (नांदेड) :** किनवट तालुक्यात पैनगंगा नदीला आलेल्या पुराचा फटका रस्ते वाहतुकीला बसला आहे. नदीच्या तांडवामुळे कोठारी, शेनिवारापेट, पैगंगा फुलागत या मार्गावरील रस्ते अक्षरशः उखडून गेले आहेत. ठिकठिकाणी रस्ता वाहून गेला असून प्रवास करणे जीवावर उदार ठरत आहे.फोटोत दिसत आहे तसे रस्त्यावरील डांबराचे थर वाहून जाऊन मोठमोठे खड्डे निर्माण झाले आहेत. ग्रामस्थांना पायी जाण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. वाहनांची ये-जा पूर्णपणे ठप्प झाली असून शालेय विद्यार्थी, रुग्णवाहिका, शेतकरी व रोजंदारीसाठी जाणारे कामगार यांचे हाल होत आहेत.पूराच्या पाण्याने आधीच हजारो एकर शेती पाण्याखाली गेली आहे. त्यात आता रस्ते वाहून गेल्याने गावागावातील संपर्क तोडला गेला आहे. ग्रामस्थांचे म्हणणे आहे की दरवर्षी पाऊस आला की अशीच परिस्थिती उद्भवते, पण अद्याप कायमस्वरूपी उपाययोजना होत नाहीत. नागरिकांनी प्रशासनाने तातडीने रस्त्यांची दुरुस्ती करावी व पर्यायी मार्गाची व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे.

## मुंबईच्या डबेवाल्यांना मिळणार हक्काची घरे : मुख्यमंत्री फडणवीस

**अक्षराज : संजय पंडीत**

**दि.१७, मुंबई :** समस्त मुंबईकरांचे पोट भरणाऱ्या डबेवाल्याना मुंबईत ५०० चौरस फुटांचे घर केवळ २५.५० लाख रुपयांत उपलब्ध करून देण्याची महत्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच वांद्रे येथे केली. प्रधानमंत्री आवास योजना आणि इतर शासकीय योजनांच्या माध्यमातून हा परवडणारा गृहनिर्माण प्रकल्प पूर्ण करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

वांद्रे पश्चिम येथे 'डबेवाला आंतरराष्ट्रीय अनुभव केंद्रा'चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्यांनी डबेवाल्यांना कमी किमतीत घरे उपलब्ध होणार असल्याची घोषणा केली. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री अ‍ॅड. आशिष शेलार, आमदार श्रीकांत भारतीय, योगेश सागर, तमिळ सेल्वन यांच्यासह नूतन मुंबई टिफीन बॉक्स सप्लायर चॅरिटी ट्रस्ट चे अध्यक्ष उल्हास मुके, मुंबई टिफीन बॉक्स सप्लायर असोसिएशनचे अध्यक्ष रामदास करवंदे, सचिव किरण गवांदे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, १३५ वर्षांच्या प्रवासात आमचे डबेवाले संगणक किंवा आर्टिफिशियल इंटेलिजन्स न वापरता मानवी बुद्धिमत्तेच्या जोरावर जगप्रसिद्ध व्यवस्थापन कौशल्य दाखवत आले आहेत. एकही चूक न करता, एकही दिवस उशीर न करता त्यांनी काम केले. ही जगातली अद्वितीय परंपरा आहे.



'डबेवाला भवन' चे रूपांतर आंतरराष्ट्रीय अनुभव केंद्रात झाल्यामुळे आणि येथे व्हर्च्युअल रिॲलिटीच्या माध्यमातून सकाळच्या भजनापासून लोकल प्रवास, डबे वितरित करणे आणि जेवणापर्यंत असा डबेवाला संस्कृतीचा थेट अनुभव घेता येत असल्याबद्दल त्यांनी कौतुक केले. डबेवाला समाजाची निर्व्यसनी, वारकरी परंपरेवर आधारित सेवा ही जगभरासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुढील काळात या केंद्रासाठी अधिक चांगल्या सुविधा आणि उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी डबेवाल्यांच्या गृहनिर्माण प्रकल्पासाठी जमीन उपलब्ध करून देणारे त्रिपाठी यांचे, तसेच नफा न घेता उत्कृष्ट दर्जाचे बांधकाम करण्याची जबाबदारी स्वीकारणारे जयेश शाह आणि संपूर्ण टीमचे विशेष कौतुक केले. सर्व प्रक्रिया पारदर्शकपणे पूर्ण करून आज या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.दरम्यान डबेवाल्यांच्या कार्याचा गौरव करताना सांस्कृतिक कार्य मंत्री अ‍ॅड.आशिष शेलार यांनी विठ्ठलाचे नाव घेत लोकांच्या पोटापाण्याची सेवा करणाऱ्या मुंबईच्या डबेवाल्यांचे आंतरराष्ट्रीय अनुभव केंद्र उभे राहणे हा मुंबईकरांसाठी अभिमानाचा क्षण असल्याचे सांगितले. हे केंद्र जगभरातील पर्यटकांना प्रेरणा आणि व्यवस्थापनाचे धडे देणारे केंद्र ठरुन म ुंबईची ओळख द्विगुणित करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मंत्री अ‍ॅड. शेलार यांनी, गिरणी कामगार, बीडीडी चाळ, धारावी, कामाठीपुरा येथील रहिवासी तसेच कोळी बांधव, पदपथावरील विक्रेते यांसारख्या विविध घटकांसाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी गृहनिर्माण व पुनर्विकासाची कामे मार्गी लावल्याबद्दल प्रशंसोद्गार काढले. मुख्यमंत्र्यांनी मुंबईकरांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार श्रीकांत भारतीय यांनी जगातले २७ विद्यापीठे संशोधन करीत असलेल्या डबेवाल्यांच्या संस्कृतीची माहिती देणाऱ्या आंतरराष्ट्रीय केंद्रामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत असल्याचे सांगून त्यांची पुढची पिढीच या केंद्राचे संचालन करणार असल्याची माहिती दिली. प्रारंभी डबेवाला असोसिएशनचे सचिव किरण गवांदे यांनी मुंबईच्या डबेवाल्यांच्या १३५ वर्षांच्या परंपरेची माहिती देऊन कोविड काळात काम ठप्प असताना नागरिकांनी केलेल्या मदतीबाबत कृतज्ञता व्यक्त केली.

## अवैध देशी- विदेशी दारु वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

### बल्लारपूर पोलिसांची कारवाई !



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, बल्लारपूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर पोलीसांनी अवैध देशी-विदेशी दारू वाहतूक करणाऱ्या आरोपीला ला अटक केली असून ६ लाख १४ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी वाहनचालक सुदर्शन शंकर दासारी (३८) वर्ष, रा. गडचांदुर यास अटक कण्यात आली. तपासात देशी दारू रॉकेट संत्रा कंपनीच्या २५ पेट्या किंमत १ लाख रुपये आणि विदेशी दारू ऑफीसर चॉईस कंपनीच्या २ पेट्या किंमत १४ हजार रुपये असा एकूण १ लाख १४ हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला. त्याचबरोबर गुन्ह्यात वापरण्यात आलेली बलीनो कार किंमत ५ लाख रुपये जप्त करण्यात आली. अशा एकूण ६ लाख १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

१६ ऑगस्ट २०२५ रोजी बल्लारपूर पोलीस स्टेशन हद्दीत डायल ११२ वाहनावरील मार्शल पेट्रोलिंग करीत असताना गुप्त माहितीच्या आधारे बामणी टी-पॉईंट, कोठारी रोड येथे नाकाबंदी करण्यात आली. नाकाबंदी दरम्यान पांढऱ्या रंगाची बलीनो कार क्रं एम.एच. ३४-सीजे-२४७७ संशयास्पदरीत्या येताना दिसली. वाहनास अडवून तपासणी केली असता त्यामध्ये देशी व विदेशी दारू अवैधरित्या वाहतूक करत असल्याचे आढळून आले.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधाकर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बिपीन इंगळे यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक मदन दिवटे, पोहवा. परमीवीर यादव, पोअं. सौरभ मुन व इतर कर्मचाऱ्यांनी केली.

पुढील तपास बल्लारपूर पोलीस करीत आहेत. या कारवाईत वाहनचालक सुदर्शन शंकर दासारी (३८) वर्ष, रा. गडचांदुर यास ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्याविरुद्ध पोलीस स्टेशन बल्लारपूर येथे महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (अ) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## नांदेड जिल्ह्यात पावसाचा हाहाकार !

### भिंत कोसळून पती-पत्नीचा मृत्यू, पैनगंगा नदीला पूर; स्कूल बस अन् थार पाण्यात वाहून गेली

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, नांदेड :** नांदेड जिल्ह्यात पुन्हा एकदा पावसाचे जोरदार पुनरागमन झाले असून, मुसळधार पावसामुळे अनेक भागांतील जनजीवन विस्कळीत झाले आहे. नद्या-नाले दुथडी भरून वाहत आहेत, तर काही ठिकाणी पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. याच पावसाने विविध दुर्घटना घडल्या असून, कंधार तालुक्यात भिंत कोसळून दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर किनवट तालुक्यात एक स्कूल बस पुराच्या पाण्यात अडकली.

**कंधारमध्ये भिंत कोसळून पती-पत्नी ठार...**

कंधार तालुक्यातील कोटबाजार गावात घराची भिंत कोसळून दोन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. मृतांमध्ये माजी ग्रामपंचायत सदस्य शेख नासेर आणि त्यांच्या पत्नीचा समावेश आहे. शेख नासेर यांच्या पत्नी विद्यमान ग्रामपंचायत सदस्या होत्या. गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे घराच्या भिंतीत ओलावा साचून ही दुर्घटना घडली, असे बोलले जात आहे. या घटनेमुळे कोटबाजार परिसरात शोककळा पसरली आहे.

**शाळेची बस पुरात वाहून गेली, चालक बेपत्ता...**

किनवट तालुक्यातही जोरदार पावसाने हाहाकार माजवला आहे. बोधडी ते सिंदगी रस्त्यावर पुराच्या पाण्यात एक रिकामी स्कूल बस अडकून पडली. पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे बस काही अंतरापर्यंत वाहून गेली, मात्र नंतर एका ठिकाणी अडकली. सुदैवाने बसमध्ये कोणी विद्यार्थी नसल्याने म ोठा अनर्थ टळला. मात्र, बस चालक बेपत्ता असून त्याचा शोध सुरू आहे.

**पाण्याच्या प्रवाहात थार वाहून गेली...**

दरम्यान, हिमायतनगर तालुक्यातील जवळगाव परिसरात हदगाव-हिमायतनगर मार्गावरील अंडरब्रीजमध्ये पाणी साचले होते. या पाण्यातून थार कार नेण्याचा प्रयत्न



चालकाने केला. मात्र, कार पाण्यातच बंद पडली. पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे ही गाडी काही अंतरापर्यंत वाहत गेल्याचा व्हिडिओ समोर आला आहे.

**नद्या-नाले तुडुंब भरले, वाहतूक ठप्प...**

माहूर तालुक्यात ढगफुटीसदृश पाऊस झाला असून, पैनगंगा नदीलाही पूर आला आहे. माहूर येथील धानोडा पुलावरुन नदीचे पाणी वाहू लागल्याने हा मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. त्यामुळे माहूर शहराचा संपर्क इतर भागांशी तुटला आहे. याशिवाय शेती पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

प्रशासन सतर्क

जिल्ह्यातील विविध भागांत मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचले आहे. प्रशासनाने नागरिकांना सतर्कतेचे आवाहन केले असून, धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे, असे आवाहन स्थानिक अधिकाऱ्यांकडून करण्यात आले आहे.

राज्यात पुन्हा एकदा पावसाने जोरदार पुनरागमन केलं आहे. हवामान विभागाने येत्या तीन दिवसांसाठी मध्य महाराष्ट्र, कोकण आणि विदर्भात पावसाचा अंदाज वर्तवला आहे. मुंबई आणि उपनगरातही पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. छत्रपती संभाजीनगर आणि अमरावती जिल्ह्यांतील अनेक भागांमध्ये ढगफुटी सदृश पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, काही गावांत पूरस्थिती निर्माण झाली आहे. मुसळधार पावसामुळे घरात पाणी शिरले असून, शेतकरी वर्गाला मोठा फटका बसला आहे.

## संपादकीय

### शिक्षक बदल्यांचा गुंता...

जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांत वर्षानुवर्षे ठाण मांडून बसलेल्या शिक्षकांच्या संघटित राजकीय शक्तीला शह देण्यासाठी काही वर्षांपूर्वी शिक्षकांच्या बदल्यांचा 'ऑनलाइन पॅटर्न' आणण्यात आला. त्यापूर्वी पात्र शिक्षकांतून दहा टक्के प्रशासकीय व विनंतीवरून पाच टक्के बदल्या होत होत्या. ही रचना बदलून राज्यातील १.८३ लाख शिक्षकांपैकी ज्यांना सर्वसाधारण किंवा अवघड क्षेत्रात सलग दहा वर्षे व एका शाळेवर पाच वर्षे झाली, त्या सर्वांना यंदा बदलीपात्र ठरविण्यात आले. प्रत्येक जिल्ह्याच्या स्तरावर दोन ते पाच हजार शिक्षकांच्या बदल्यांचा घोळ गेल्या आठ महिन्यांपासून राज्यात अद्यापही सुरू आहे. त्यामुळे ग्रामीण भागात शिकणाऱ्या गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले आहे. 'संवर्ग एक' ते 'संवर्ग चार'च्या नवीन प्रशासकीय उतरंडीमुळे काही जोमात, तर काही कायमचे कोमात गेले आहेत.

संवर्गाच्या या व्यवस्थेमुळे संवर्ग एक मध्ये बोगसगिरीचे प्रमाण खूपच वाढले आहे. खोटे दिव्यांग पत्र मिळवणे, दुसरे लग्न करूनही घटस्फोटित दाखवणे, दिव्यांग पाल्याचे निधन झाल्यानंतरही सवलतीचा लाभ घेत राहणे, गंभीर आजार नसताना 'चिरीमिरी' देऊन बनावट प्रमाणपत्र मिळवणे आदी प्रकार सर्रास होत आहेत. खुद्द ग्रामविकास मंत्र्यांच्या सातारा जिल्ह्यासह काही ठिकाणच्या जिल्हा परिषदांनी असे प्रकार शोधून त्यांना अटकाव घालण्याचाही प्रयत्न केला आहे. मात्र, प्रशासनातून संरक्षण मिळणाऱ्या बोगस उमेदवारांची हिंमत दरवर्षी वाढत आहे.

'संवर्ग दोन'मध्ये पती-पत्नीच्या शाळेतील विहित अंतर बोगसगिरी करून कमी दाखवणाऱ्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या अभियंत्याला अलीकडेच कारवाईला सामोरे जावे लागले. 'संवर्ग तीन'मध्ये समाविष्ट शिक्षकांची सेवाज्येष्ठता 'शासन निर्णया'तील तरतुदीनुसार न करता सॉफ्टवेअर कंपनीच्या त्रुटींमुळे कमी जास्त होणे, वेगवेगळ्या 'शासन निर्णया'तील वेगवेगळ्या निकषांमुळे अवघड क्षेत्रातील शाळा बदलणे या गैरप्रकारांमुळे वाद गाजत आहेत. 'संवर्ग चार'मधील ३० ते ५२ वयोगटातील शिक्षकांच्या शंभर ते दीडशे किलोमीटर अंतरावरील शाळांत बदल्या होत आहेत.

शासकीय नोकरीच्या कार्यक्षेत्रात बदली बंधनकारक केल्याने पाच वर्षे पूर्ण झालेल्या हजारो शिक्षकांना यास सामोरे जावे लागते. त्यापेक्षा नोकरीच्या वेळीच विशिष्ट ५०-६० गावांचा गट करून या गावातील शाळांसाठी 'शिक्षक भरती'ची जाहिरात देऊन केवळ नमूद गावातच नोकरी करावी, ही अट टाकून भरती करणे श्रेयस्कर ठरेल. उन्हाळी सुट्या हा बदल्यांचा हंगाम. शैक्षणिक वर्षे संपलेले असते, शिक्षकांनाही कुटुंबाचे स्थलांतर करताना अडचण येत नाही, मुलांचे शिक्षणासाठी प्रवेश घेणे सुलभ होते; पण या बाबी दुर्लक्षित करून चाळीस-पंचेचाळीस टप्प्यांची बदली प्रक्रिया सुरू करण्यात आली. आतापर्यंत केवळ ३४ टप्पे पार पडताना आठ महिने निघून गेले आहेत.

कार्यरत शिक्षकांतील सर्वच जण 'संवर्ग १'चा फायदा घेऊन एखादा तालुका सांभाळत असतील, तर त्या शाळेत कामकाजाला मर्यादा येतील व आधीच समाजाच्या नजरेतून कमी झालेल्या शाळा पुन्हा व प्राथमिक शिक्षण अधिकच गटांगळ्या खाईल. त्यामुळे सर्वंकष मार्ग काढणे आवश्यक आहे. बदल्यांचा हा घोळ केवळ शिक्षकांच्या नशिबी आला आहे. अन्य खात्यात मात्र एका आठवडाभरात बदली प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडली जाते.

तोडगा निघत नसेल, तर यंदाच्या वर्षी बदलीची प्रक्रिया थांबवून पुढील वर्षापासून मागच्या पद्धतीने प्रक्रिया राबवली, तर पुढचे नुकसान टाळण्यास मदत मिळेल. 'शिक्षकांच्या वारंवार बदल्या करण्याची हानिकारक प्रथा थांबवली जाईल; जेणेकरून विद्यार्थ्यांचे रोल मॉडेल आणि शैक्षणिक वातावरण यात सातत्य राहील,' असे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातही म्हटले आहे. मात्र, त्यानुसार ग्रामविकास विभागाकडून अंमलबजावणी होणार का, हा प्रश्न आहे.

# असामान्य अभिनेत्री काळाच्या पडद्याआड!



मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय चेहरा, ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचे वयाच्या ६९ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीवर एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ज्योती चांदेकर या मराठी रंगभूमीवरील नावाजलेल्या अभिनेत्री होत्या. केवळ रंगभूमीवरच नाही तर चित्रपट आणि दूरचित्रवाहिनीवरील मालिकेतही त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. ज्योती चांदेकर यांना लहानपणापासूनच अभिनयाची आवड होती. लहान असतानाच त्यांनी काही नाटकात अभिनय केला. पुढे अभिनय क्षेत्रातच करियर करायचे असे ठरवून त्यांनी नाटकात भूमिका केल्या. त्यांनी अभिनय केलेले सुंदर मी होणार आणि मिसेस आमदार ही नाटके रंगभूमीवर तुफान गाजली. त्यातील त्यांच्या भूमिका त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरल्या. या भूमिकांनी त्यांना रंगभूमीवर असामान्य अभिनेत्री असा गौरव मिळवून दिला. या नाटकातील त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना खूप भावल्या. त्यानंतर त्यांनी चित्रपटाकडे आपला मोर्चा वळवला. ग्यानबाची मेख हा त्यांचा पहिला चित्रपट. त्यानंतर त्यांनी तिचा उंबरठा, ढोलकी, सुखांत, मी सिंधुताई सपकाळ, फुलवात, देवा, श्यामची आई या चित्रपटातूनही भूमिका केल्या. ज्योती चांदेकर यांनी रणजीत पंडित यांच्याशी विवाह केल्यावर त्यांना पौर्णिमा व तेजस्विनी या दोन मुली झाल्या. तेजस्विनी ही मराठी चित्रपट सृष्टीतील सध्याची आघाडीची अभिनेत्री आहे. लग्नानंतरही ज्योती चांदेकर यांनी आपले नाव बदलले नाही. ज्योती चांदेकर यांच्या अभिनय कारकिर्दीसाठी त्यांच्या पतीने मोठा त्याग केला. ज्योती चांदेकर यांची अभिनय कारकिर्द सुरू रहावी यासाठी त्यांच्या पतीने आपली नोकरी सोडली आणि मुलींचा सांभाळ करण्याचा निर्णय घेतला. ज्योती चांदेकर यांच्या कारकिर्दीत अनेक चढ उतार निर्माण झाले पण त्या डगमगल्या नाहीत. आलेल्या संकटावर त्यांनी मात केली आपली अभिनय कारिकर्द यशस्वी केली. चित्रपट आणि नाटकासोबतच त्यांनी टीव्हीवरील मालिकेतही भूमिका केल्या. त्यांनी साकारलेली 'ठरलं तर मग' मालिकेतील पूर्णा आजी, मी सिंधुताई सपकाळ या चित्रपटातील सिंधुताई सपकाळ या भूमिका प्रेक्षकांना खूप भावल्या. देवा एक अतरंगी या चित्रपटामधील त्यांची भूमिका देखील प्रेक्षकांना भावली. ज्योती चांदेकर यांनी असंख्य नाटकं आणि मालिका यांच्या माध्यमातून आपल्या अभिनयकलेचा अविस्मरणीय ठसा उमटवला. ठरलं तर मग आता या मालिकेत त्यांनी साकारलेली पूर्णा आजी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली. या भूमिकेने त्यांना घराघरात पोहचवले. ज्योती चांदेकर या संपूर्ण महाराष्ट्राची लाडकी पूर्णा आजी बनल्या. याच मालिकेत अभिनय करत असताना त्या आजारी पडल्या आणि त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. पडद्यावरील त्यांची सहजसुंदर अभिव्यक्ती, आत्मीय भाव आणि प्रांजळ संवादकळा प्रेक्षकांच्या मनात कायम राहतील. त्यांच्या जाण्याने एक प्रेमळ आई, जिव्हाळ्याची कलाकार, असामान्य अभिनेत्री काळाच्या पडद्याआड गेली आहे. ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली !



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५

# सार्वजनिक गणेशोत्सवामागील उद्देश आणि बदललेले स्वरूप !

मनुष्य हा मुळातच उत्सवप्रिय प्राणी असल्याने कोणताही आनंद इतरानसोबत साजरा करण्यात त्याला अधिक रुचि असते. त्यामुळे आपल्याकडे धार्मिक आणि राष्ट्रीय सण तसेच उत्सव अत्यंत उत्साहाने साजरे होतात. नुकताच साजरा झालेला दहीहंडी उत्सव आणि त्याला प्राप्त झालेले व्यापक स्वरूप हा त्याचाच एक भाग आहे. लोकांच्या अतिउत्साहामुळे आणि धार्मिक शिक्षणाच्या अभावामुळे सध्या धार्मिक उत्सव साजरा करताना त्यामागील उद्देश विचारात घेतला जात नाही किंवा त्याला दुय्यम स्थान दिले जाते परिणामी त्या उत्सवाचा केवळ इव्हेंट बनू लागला आहे. दहीकाला उत्सवाचे तेच झाले आहे आणि सार्वजनिक गणेशोत्सव सुद्धा हळूहळू त्या दिशेने वाटचाल करू लागला आहे.

आजमितीला सार्वजनिक गणेशोत्सव केवळ मुंबई, ठाणे आणि पुणेपुरता मर्यादित राहिला नसून राज्यातील सर्वात मोठा उत्सव बनला आहे. देशातील अनेक राज्यांतही तो उत्साहाने साजरा होऊ लागला आहे. यानिमित्ताने राज्याच्या अर्थकारणात दरवर्षी मोठ्या प्रमाणात उलाढाल होत असते. शहरासारख्या ठिकाणी या दिवसांत एवढ्या मोठ्या प्रमाणात भाविकांची वर्दळ असते की कधी रात्र सुरु झाली आणि कधी संपली याचा पत्ताही लागत नाही. शहरातील सार्वजनिक गणेशोत्सवाची मजा लुटण्यासाठी देश विदेशातून भाविक आणि पर्यटक मोठ्या प्रमाणात शहरांत दाखल होतात. देशाच्या सीमा ओलांडून साता समुद्रापार ज्या ज्या ठिकाणी मराठी माणूस वसला आहे त्या त्या ठिकाणी सार्वजनिक गणेशोत्सव आज साजरा होऊ लागला आहे. मुळात 'कुटुंबातील मंडळींनी एकत्र येऊन साजरा करायचा एक सण असलेली श्री गणेशचतुर्थी सार्वजनिक उत्सव कशी बनली', हे समजून घेऊया.

सार्वजनिक गणेशोत्सवाचे प्रणेते म्हणून लोकमान्य टिळक यांना ओळखले जाते. एकदा लोकमान्य टिळकांनी ह.भ.प. श्रीपतीबुवा भिंगारकर यांना विचारले, 'मी स्वराज्यप्राप्तीसाठी प्रयत्न करीत आहे; पण ईश्वरी साहाय्यावाचून कोणतेही कार्य शेवटास जात नाही. तेव्हा या स्वराज्याच्या कार्याचा राष्ट्रभर प्रसार होण्यासाठी कोणाची आराधना करावी ?' बुवा म्हणाले, 'तुम्ही श्री गणपतीची पार्थिव पूजा चालू करा, म्हणजे तुमचे सर्व हेतू सिद्धीस जातील.' त्यावर लोकमान्य टिळक म्हणाले, 'मी एकट्याने अशी पूजा करून भागणार नाही. राष्ट्रभर ती सर्वांनी केली पाहिजे. आपल्याकडे भाद्रपद शुद्ध चतुर्थीस घरोघर पार्थिव गणपतीची पूजा करायचा पूर्वीचा प्रघात आहेच. तो आता राष्ट्रभर चालू करूया.' तेव्हापासून लोकमान्यांच्या प्रेरणेने सार्वजनिक गणेशोत्सव चालू झाला ! यावरून आपल्याला 'सार्वजनिक गणेशोत्सव चालू होण्यामागील मूळ प्रेरणा राष्ट्रहित आणि ईश्वरभक्ती ही आहे', हे स्पष्ट होते.

'सार्वजनिक गणेशोत्सव चालू करण्यामागील आपले उद्देश कोणते आहेत', हे लोकमान्य टिळकांनी तेव्हाच एका भाषणात स्पष्ट केले. वर्ष १८९४ मध्ये झालेल्या त्यांच्या भाषणाचा सार म्हणजे 'धर्मजागृती, राष्ट्रजागृती आणि पाश्चिमात्य संस्कृतीच्या आक्रमणाचा विरोध', हे सार्वजनिक गणेशोत्सव चालू करण्यामागील मुख्य उद्देश होत. आता मनात प्रश्न येतो की, हे उद्देश आज कालबाह्य झाले आहेत का ? सध्या किती ठिकाणी या उद्देशांना अनुरूप ठरेल, अशा प्रकारे हा उत्सव साजरा केला जात आहे ? आज अनेक ठिकाणी गणेशोत्सवासाठी वर्गणी काढताना जबरदस्ती केली जाते. काहींची आर्थिक क्षमता नसताना समाजात इतरांसोबत राहायचे म्हणून त्यांना पदरमोड करून वर्गणी द्यावी लागते. काही ठिकाणी मंडळातील कार्यकर्ते हा समजूतदारपणा दाखवतात; मात्र काही ठिकाणी नागरिकांना वर्गणी देण्यासाठी त्रास दिला जातो हे नाकारता येणार नाही. वर्षागणिक निरनिराळी मंडळे स्थापन होऊ लागली आहे. शहरांत १००मीटरच्या परिसरातही २-३ मंडळे स्थापन झालेली पाहायला मिळतात. जवळजवळच्या मंडळांमध्ये सजावट, गणेश मूर्तीची उंची, उत्सवानिमित्त ठेवण्यात आलेले कार्यक्रम, आगमन-विसर्जन मिरवणूका अशा वेगवेगळ्या कारणांमुळे भांडणे होताना पाहायला मिळतात. ज्या ठिकाणी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी जमते अशा मंडळांच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्सवादरम्यान भलताच उत्साह संचारलेला असतो. या उत्साहाच्या भरात आलेल्या भाविकांशी वाद घालणे, त्यांना शिवीगाळ करणे असले प्रकार या काळात हल्ली बातम्यांमध्येही पाहायला मिळू लागले आहेत. भाविकांना आकर्षित करण्यासाठी मंडपात उंच गणेशमूर्ती बसवली जाते; मात्र अनंत चतुर्दशीला तिचे पूर्ण विसर्जन न करताच कार्यकर्त्यांकडून पळ काढला जातो. ज्या गणेशमूर्तीची १० दिवस मनोभावे पूजा केली जाते, त्याच मूर्तीची पुढे अवहेलना होते. सजावट, विद्युत रोषणाई यांवर अमर्याद खर्च केला जातो. मिरवणुकांमध्ये मंगलवाद्ये वाजवण्याऐवजी अथवा सात्विक गाणी किंवा भजने लावण्याऐवजी जीवघेणा डीजे लावून त्यावर चित्रविचित्र अंगविक्षेप करत नृत्य केले जाते. आगमन विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणाऱ्यांकडून काही ठिकाणी मद्यपान केले जाते. सार्वजनिक गणेशोत्सवाचे निमित्त करून काही ठिकाणी गणेश मंडपातच रात्री जुगाराचा डाव बसतो. या दिवसांत विधायक आणि समाजोपयोगी प्रबोधनात्मक कार्यक्रम ठेवण्याऐवजी काही ठिकाणी लावणी अथवा चित्रपट संगीताचे कार्यक्रम ठेवले जातात. या कालावधीत गणेश मंडपातील वातावरण सात्विक राहण्यासाठी सुमधुर भजने अथवा गणरायाची गाणी, स्तोत्र लावण्याऐवजी कर्णकर्कश आवाजात चित्रपट गीते लावली जातात. आरत्या म्हणताना त्या मंजुळ आवाजात न म्हणतात आरडाओरड करत म्हटल्या जातात. श्रीच्या मंडपात स्वच्छता ठेवली जात नाही.

श्री गणेशाच्या हा उत्सव सार्वजनिक असला तरी तो धार्मिक उत्सव आहे. राष्ट्रकार्याला धार्मिक अधिष्ठान असावे आणि त्यातून राष्ट्रजागृतीचा संदेश लोकांपर्यंत पोहोचावा या उद्देशाने लोकमान्य टिळकांनी हा उत्सव सुरु केला. आजमितीला हा उद्देश लोप पावून उत्सवात अपप्रवृत्ती शिरल्या आहेत. अर्थात वर नमूद केलेले प्रकार हे काही ठिकाणीच पाहायला मिळत असले तरी ते आपल्या धार्मिक उत्सवाला गालबोट लावणारे असल्याने ते थांबायला हवेत. आज हिंदूंमध्ये धर्मशिक्षणाचा अभाव असल्याने उत्साहाच्या भरात ते काय करत आहेत हे त्यांच्याच लक्षात येत नाही. आपल्या उत्सवात शिरलेल्या या चुकीच्या प्रथांना उखडून उत्सव सात्विक आणि लोकहिताचा व्हावा यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करण्याची आज नितांत आवश्यकता आहे.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## काला..

पोहे लोणचे लाही
चणे साखर घाला
पापड भाकरी फळे
वर लोण्याचा गोळा

दही दुधात कालवा
जमे गोपाळकाला
झकास गोड प्रसाद
जन्माष्टमीला केला

लहान थोर भेद ना
सगळे झाले गोळा
जातीधर्म भिन्न जरी
रे सवंगड्यांचा मेळा

पूर्णावतारी गोविंदा
अवतार आठ केला
भावभक्ति स्नेहसुख
ऐक्य प्रतिक काला

गाववाड्यात जुमला
खाण्यासाठी जमला
गोविंदाच्या भजनात
प्रत्येक जण रे रमला

संघटनघडते निमीत्ते
कुणी न राहो एकला
जे राहे अलिप्तआज
परमानंदला मुकला

अक्षराज अचूक वेध, अचूक बातमी

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो. ९७३०३०६९९६**

# श्रीमंत राजे रघूजी भोसले यांच्या ऐतिहासिक तलवारीचे होणार लोकार्पण

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१७, ठाणे :** श्रीमंत राजे रघूजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार दि.१८ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबईत दाखल होणार असून महाराष्ट्र शासनातर्फे मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर जोरदार स्वागत होणार आहे. तर संध्याकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकार्पण सोहळा पार पडेल.

श्रीमंत राजे रघूजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार महाराष्ट्र शासनाने लिलावात जिंकली असून नुकतीच सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी लंडन येथे ही तलवार ताब्यात घेतली असून १८ ऑगस्टला ती मुंबईत दाखल होईल. विमानतळ प्राधिकरणाकडून सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार सकाळी १० वाजता ही ऐतिहासिक तलवार स्वीकारतील. त्यानंतर विमानतळावरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन बाईक रॅली काढून, चित्ररथावर विराजमान करुन ही तलवार पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीकडे नेण्यात येईल.

दरम्यान, संध्याकाळी ६ वाजता सांस्कृतिक कार्य विभाग, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय सांस्कृतिक कार्य संचालनालय, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी तर्फे सेना साहेब सुभा पराक्रम दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात श्रीमंत राजे रघूजी भोसले यांच्या ऐतिहासिक तलवार प्रदर्शनाचे उद्घाटन व लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होईल. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान तथा मुंबई उपनगर पालक मंत्री ॲड.आशिष शेलार, श्रीमंत राजे रघूजी भोसले यांचे वंशज श्रीमंत मुधोजी राजे भोसले यांच्यासह खासदार अनिल देसाई, आमदार महेश सावंत, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी उपस्थित राहणार आहेत.



सोमवार, १८ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई येथे हा कार्यक्रम होणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे संचालक डॉ. तेजस मदन गर्गे, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर आणि सांस्कृतिक संचनालयाचे संचालक विभिषण चवरे यांनी केले आहे.

### तलवारीचे प्रदर्शन!

श्रीमंत सेना साहेब सुभा रघुजीराजे भोसले यांच्या इंग्लंडमधून आलेल्या तलवारीचे व बारा वारसा मानांकित गडकिल्ल्यांच्या माहितीचे प्रदर्शन, दि.१९ ते दि.२५ ऑगस्ट २०२५, सकाळी ११ ते सायं ७ दरम्यान, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई येथील कला दालनात सुरू राहणार आहे. हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

# राजेंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम संपन्न

**अक्षराज : बाळू धायगुडे**



**दि.१५, खंडाळा (सातारा) :** खंडाळा विभाग शिक्षण समिती खंडाळा संस्थेच्या शैक्षणिक संकुलामध्ये ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण समारंभ उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे ध्वजारोहण राजेंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य तुळशीराम खांडे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमासाठी खंडाळा विभाग शिक्षण समिती खंडाळा संस्थेचे अध्यक्ष शंकरराव गाढवे, उपाध्यक्ष सुरेश पवार, संस्थेचे सचिव अनिरुद्ध दादा गाढवे व संस्थेचे संचालक, पदाधिकारी, विद्यालयाच्या उपप्राचार्या अरुंधती गाढवे, पंचक्रोशीतील आजी-माजी स्वातंत्र्यसैनिक, ग्रामस्थ, पालक, विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रम प्रसंगी एन.सी.सी.विभागाच्या वतीने संचलन व ध्वजास मानवंदना देण्यात आली. शासन परिपत्रक याप्रमाणे विद्यालयामध्ये कवायतीचे प्रकार घेण्यात आले. गीत मंचाच्या वतीने राष्ट्रभक्तीपर गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला. राजेंद्र माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय खंडाळा व खंडाळा इंग्लिश मीडियम स्कूल खंडाळा मधील विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य खांडे यांनी उपस्थितांना संदेश देताना आधुनिक शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले व सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.प्रवीण बोरगावे यांनी केले व आभार प्रदर्शन खंडाळा इंग्लिश मीडियम स्कूल खंडाळा विद्यालयाचे प्राचार्य जयवंत जगताप यांनी केले. अशा प्रकारे विद्यालयात स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम उत्सहात संपन्न झाला.

# कै.भीमराव दत्तू कोळी यांच्या स्मरणार्थ मोफत आरोग्य शिबिर आयोजन

**अक्षराज : राहुल शिंदे**

**दि.१७, पेठवडगाव (कोल्हापूर) :** हातकणंगले तालुक्यातील पेठ वडगाव येथे न्यू श्री गुरुकृपा हॉस्पिटल यांच्यामार्फत मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरामध्ये न्यू गुरुकृपा हॉस्पिटलचे तज्ञ डॉक्टर उपस्थित होते. या शिबिरामध्ये १३७ रुग्णांना मोफत सेवा देण्यात आली. या शिबिरामध्ये ज्येष्ठ नागरिक बालचमू व महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. तसेच गुरुकृपा हॉस्पिटलमध्ये तज्ञ डॉक्टरांमार्फत सर्व रुग्णांची तपासणी करण्यात आली. यामध्ये हृदयविकार, मेंदू विकार, पोटाचे आजार, सांधेदुखी, किडनी व मूत्रविकार, दमा, उच्च रक्तदाब, इत्यादी आजाराविषयी मोफत तपासणी करण्यात आली. यावेळी न्यू गुरुकृपा ग्रुप हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉक्टर सत्यजित जाधव यांनी सर्व रुग्णांना मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित डॉ.विनोद पाटील, डॉ.सविता जाधव, डॉ.सागर सरवदे, ओमकार पाटील, सचिन बारवडे, करिष्मा कांबळे, चेतन मोरे, ज्योती मोरे, धनश्री पाटील, महेश पांढरबळे आदी रुग्णांची उपस्थिती लक्षणीय होती.

# निर्माणधीन पुलाच्या बाजूस असलेला पूल गेला वाहून; १० गावांचा संपर्क तुटला

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.१७, पालम (परभणी) :** पालम ते पुयणी दरम्यान पुयणी गावाजवळ लेंडी नदीवर नवीन पुलाचे बांधकाम चालू आहे. त्याच ठिकाणी दळणवळण सुरळीत चालू करण्याकरिता निर्माणाधिन पुली शेजारी सदरील रस्त्यावरची दळणवळण, वाहतूक चालू ठेवण्याकरता नवीन पूल बांधण्यात आला होता मागील दोन दिवसापासून जोरदार पाऊस झाल्याने नदीला मोठया प्रमाणात पूर आला. या पुरामध्ये सदरील पर्यायी पूलच वाहून गेला आहे. यामुळे या पुलापलीकडे असणाऱ्या पुयनी, आडगाव, तेलजापूर, गणेशवाडी, वनभुजवाडी, नाव्हा, नाव्हलगाव, खडी, कांदलगाव आदी १० गावाचा संपर्क १६ ऑगस्ट ला संध्याकाळी १० वाजल्यापासून पालमशी तुटला आहे. सदरील पुलाचे बांधकाम करणार्या गुत्तेदाराशी संपर्क होऊ शकला नाही. परंतु या पर्यायी पुलाचे काम तात्काळ करून द्यावे असे या रस्त्यावर ये जा करणाऱ्या नागरिकांची मागणी आहे.

# पावसामुळे जनजीवन विस्कळीत; नदी नाल्यांना महापूर

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**



**दि.१७, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील रोहीपिंपळगाव येथील काही दिवसांपूर्वीच नव्याने तयार केलेला कालवा फुटल्याने शेतकऱ्यांच्या शेतात पाणी शिरले असून खरीप पिके पाण्याखाली गेल्याने अतोनात नुकसान झाले असून शेतात तलावाचे स्वरूप पहावयास मिळाले आहे दिवसभराच्या संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून नदी नाल्यांना महापूर आला आहे. मुदखेड तालुक्यातील तिन्ही मंडळात आज रोजी झालेल्या पावसाची नोंद ३.२ मी मी प्रगतशील पाऊस ५९६.६ मी मी (सामान्य ५२३.१ मी. मी. च्या तुलनेत ११४.१%) मुघट मंडळात आज पडलेला पाऊस १.८ मी मी नोंद झाली आहे प्रगतशील पाऊस ६२४.२ मी मी (सामान्य ५२३.१ मी मी च्या तुलनेत ११९.३%) बारड मंडळा आजचा पाऊस ४.० मी मी प्रगतशील पाऊस ५२८.९ मी मी (सामान्य ५२३.१ मी मी च्या तुलनेत १०१.१%) नोंद झाली आहे मुदखेड तालुक्यात दि.१६ शनिवार रोजी मुगट, मुदखेड, बारड, हलक्या स्वरूपाचा पाऊस नोंदवला गेला आहे मुगट मंडळात १.८ मी मी, मुदखेड मंडळात.३.२ मी मी, बारड मंडळात ४.० मी मी पावसाची नोंद झाली आहे या मंडळात प्रगतिशील पावसाचे प्रमाण सामान्य पेक्षा जास्त असून मुगट व मुदखेड मंडळात ११५ % पेक्षा अधिक पाऊस झाला आहे बारड मंडळात जवळपास सामान्य इतका १०१% पाऊस झाले असल्याची माहिती कृषी सहाय्यक राम कपाटे यांनी दिली आहे

रोहीपिंपळगाव येथे नव्याने तयार करण्यात आलेला शेतात जाणारा कालवा फुटल्याने खरीप पिके खरडून गेल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे बारड चा शनिवार आठवडी बाजारात पाणी साचल्याने भाजीपाला विक्रेत्यांचे हाल झाले जिथे जागा सुरक्षित मिळेल तिथे बाजार भराव लागला होता. पावसामुळे नदीकाठचे शिवारास तलावाचे स्वरूप आले होते.

# वाटद एमआयडीसीला कडाडून विरोध; जीव गेला तरी चालेल - प्रथमेश गावणकर

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१७, मुंबई :** निसर्ग सौंदर्याने नटलेला कोकण प्रांतांत रोजगार निर्मितीच्या व विकासाच्या नावाखाली येथील आंबा, काजू, भातशेती व मसेमारी ह्या मुख्य उपजीविकेला बाधित असे प्रकल्प कोकणात आणले जात असल्याने रत्नागिरीतील प्रस्तावित वाटद.एम.आय.डी.सी ला. येथील खंडाळा पंचक्रोशीतील नागरिकांनी कडाडून विरोध केला आहे, प्रस्तावित वाटद एमआयडीसी रद्द व्हावी. या मागणी करीता वाटद एमआयडीसी विरोधी संघर्ष कृती समिती ता.जि. रत्नागिरी समितीने रविवार, दिनांक १७ ऑगस्ट २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन हॉल, दादर -मुंबई येथे जाहीर जनसंवाद सभा आयोजित करण्यात आली होती,. सभेला एकच जिद्द वाटद एमआयडीसी रद्द चा नारा देत कोकणातील निसर्गप्रेमी, शेतकरी, वाटद पंचक्रोशीतील नागरिक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. सभेला प्रमुख मार्गदर्शक ॲड.असीम सरोदे-(संविधान विश्लेषक वकील सर्वोच्च न्यायालय) यांनी व्हिडीओद्वारे जनसंवाद साधला तर प्रथमेश गावणकर (समिती प्रमुख वाटद एमआयडीसी संघर्ष कृती समिती), ॲड.रोशन पाटील (वकील उच्च न्यायालय मुंबई/ प्रदेशाध्यक्ष: शिवराज्य संघटना महाराष्ट्र), अतुल म्हात्रे (मास्टर ऑफ आर्किटेक/ प्रमुख शिवराज्य संघटना महाराष्ट्र) सहदेव वीर (अध्यक्ष प्रमुख वाटद एमआयडीसी संघर्ष कृती समिती), संतोष बारगुडे (उपाध्यक्ष प्रमुख वाटद एमआयडीसी संघर्ष कृती समिती) यांची प्रमुख उपस्थिती मार्गदर्शन लाभले, वाटद एमआयडीसी संघर्ष कृती समितीचे प्रमुख प्रथमेश गावणकर यांनी विविध पुराव्यांच्या आधारे संवाद साधताना वाटद एमआयडीसी बाबत संभ्रम निर्माण करणाऱ्यांचा खरपूस समाचार घेतला. ही लढाई कोणत्या व्यक्तीविरोधी नसून ही लढाई





येथील नागरिकांच्या न्याय हक्कासाठी आहे. २०१९ ला वाटद एमआयडीसी प्रस्तावित झाल्याचे सांगत २०२२ ला वाटद एमआयडीसी साठी प्रस्तावित जागा परवडणारी नसल्याचे कारण सांगून ती रद्द करण्यात येत असल्याची अधिसूचना जाहीर करण्यात आली, १४ सप्टेंबर २०२४ ला नवीन प्रस्तावित अधिसूचना जाहीर करून ३२/२ ची नोटीस जाहीर करण्यात आली. ९ दिवसांत जमीन मोजणी प्रक्रिया सुरू झाली,मात्र एमआयडीसी ला कोणती जागा संपादित करायची आहे. याचा अधिसूचनेत उल्लेख नाही.

२५ सप्टेंबर २०२४ ला नोटीस काढून हरकती नोंदवण्याची अधिसूचना जाहीर करण्यात आली. सदर जागेत कोणताही फेरबदल करायचे झाल्यास त्याला सरकारची अनुमती लागेल, मात्र जमीन विक्री आजतागायत सुरू आहे. ही संभ्रमवस्था त्यांच्या भाषणातून प्रकर्षाने समोर आली. ३ ऑक्टोबर २०२४ ला ५०० पेक्षा अधिक सह्यांचे प्रांताधिकारी यांना निवेदन देण्यात आले. जनसुनावणी ही स्थानिक पातळीवर घेतली पाहिजे. ही आमची प्रमुख भूमिका होती. ३ ऑक्टोबर २०२४ ला स्मरण पत्र देऊन मोजणी प्रक्रिया उधळून लावली, ९ दिवसात कारवाई करणारे सरकार आमच्या मागणीला उत्तरे द्यायला ८ महिने लावते अशी शोकांतिका ही गावणकर यांनी व्यक्त केली, प्रोजेक्टला नक्की जागा कीती लागणार आहे कारण रिलायन्स वेबसाईटवर सदर प्रकल्पाला ३०० एकर जागा लागणार असल्याची माहिती मिळते, मग सरकारला आमचा प्रश्न आहे. साधारण २२५५ एकर जागा घेऊन प्रकल्प हा ३०० एकरवर आणत आहे ?असा प्रश्नही त्यानी ययावेळी उपस्थित केला, संविधानाने प्रक्रियेतील तुम्ही नोकर आहात जनतेला याची उत्तरे अपेक्षित आहेत. प्रकल्प हवाय यासाठी पालकमंत्री उदय सामंत यांना ७ते ८ सरपंच भेटल्याच्या बातम्या आल्या मात्र त्यातील एकही सरपंच आमच्यातला नाही, पालकमंत्री सामंत यांनी वाटद एमआयडीसी विरोधकांची बाजू समजून घेतली पाहिजे, ८५० सातबारा काढले त्यात खरेदी करणारे नेते, प्रशासकीय सेवेतील अधिकारी यांचेच लागेबांधे असल्याचे दिसून येते, जमीन खरेदी करणारे हे मोठ्या प्रमाणात परप्रांतीय असल्याचे गावणकर यांनी सांगितले, मुंबई स्थित ग्रामस्थांनी गणपती, शिमगोत्सव, दिवाळी, अशा महत्वाच्या सणांना गावी येत जावा, गावातील अशिक्षित समाजबांधवांना सहकार्य करा असेही त्यानीं कोकणातील मुंबई स्थित बांधवांना महत्वाचे आवाहन केले, शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे कोकणातील गावे, कातळ,माळरान ओस पडली,मात्र यापुढे ते आम्ही होऊ देणार नाही,जीव गेला तरी चालेल, १० लाखापेक्षा ५०० जरी संगती असतील तरी हा लढा चालू राहील, आंदोलन सुरू झाल्यापासून मला धमक्या, ग्रामपंचायत सदस्यांच्या अंगावर राजकीय कार्यकर्ते धावून येतात,असे भयावह वास्तव समोर उभे आहे मात्र ग्रामस्थांच्या बाजूने हा लढा जोपर्यंत वाटद एमआयडीसी रद्दची अधिसूचना जाहीर होत नाही तो पर्यंत चालूच राहील असा इशारा ही त्यांनी येथील लोकप्रतिनिधींसह सरकारला दिला, आज चर्चा ही मुद्यांवर होयला पाहिजे मात्र ती बंद खोलीत नको असेही प्रथमेश गावणकर यांनी यावेळी ठणकावून सांगितले, प्रथमेश गावणकर यांच्यासह प्रमुख मान्यवर मार्गदर्शक

ॲड.रोशन पाटील, अतुल म्हात्रे, सहदेव वीर, दामोदर गोरीवले, देवधर बागडे, ओमकार शितप, मोघे, ॲड. विकी कदम, अमोल भातडे,प्रणिता गावणकर आदी प्रमुख मार्गदर्शक, ग्रामस्थ, पदाधिकारी यांनी रोखठोक मनोगत व्यक्त करत प्रस्तावित वाटद एमआयडीसीला तीव्र विरोध दर्शवला आहे. येणाऱ्या गणेशोत्सवात संपूर्ण वाटद-खंडाळा पंचक्रोशीत आणि रत्नागिरी जिल्ह्यात प्रत्येक घराघरात कोकणच्या निसर्ग सौंदर्याची राखरांगोळी करणाऱ्या प्रकल्पाच्या विरोधात जनजागृती करण्याचा निर्धार यावेळी उपस्थित मुंबईस्थित ग्रामस्थांनी केला.

# १७ पेट्या विदेशी दारु व एक वाहन असा एकुण ५ लाख ११ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७ चंद्रपूर :** मध्य प्रदेश राज्यातून अवैधरित्या आणलेली परदेशी दारू चंद्रपूर जिल्ह्यात तस्करीसाठी नेण्यात येत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत दोन तस्करांना अटक केली. पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करत असताना त्यांना खात्रीशीर गुप्त माहिती मिळाली की, मध्य प्रदेशातून अवैध दारू ब्रम्हपुरी येथे नेण्यात येणार आहे. त्यानुसार पथकाने मौजा बाम्हणी रोडवर नाकाबंदी करून सापळा रचला.

दरम्यान संबधित वाहन आल्यानंतर त्याची झडती घेतली असता त्यात १५ पेट्या रॉयल स्टॅग विदेशी दारू (७२० बाटल्या, १८० एम.एल.) किंमत



## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

१,८७,००० रुपये व २ पेट्या रॉयल स्टॅग विदेशी दारू (१९० बाटल्या, ९० एम.एल.) किंमत २४,००० रुपये असा माल मिळून आला. त्याचबरोबर सदर वाहनासह एकूण ५,११,९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईत १७ पेट्या विदेशी दारू आणि एक वाहन असा एकूण ५ लाख ११ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपी प्रफुल प्रकार घरडे (वय ३१) रा.हनुमान नगर, ब्रम्हपुरी आणि अक्षय रुपचंद पिल्लेवार (वय २७) रा.देलनवाडी, ब्रम्हपुरी यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याविरुद्ध नागभीड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास नागभीड पोलीस करीत आहेत.ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात सपोनि दीपक कॉक्रेडवार, बलराम झाडोकार, संतोष निंभोरकर, सर्वेश बेलसरे, पोहवा जयंता चुनारकर, नितेश महात्मे, पोअं गणेश भोयर, प्रदीप मडावी, अजित शेन्डे व चापोहवा दिनेश अराडे यांनी केली.

# लोकमान्य टिळक कन्या विद्यालय चंद्रपूर येथे स्वातंत्र्य दिन साजरा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** लोकमान्य टिळक स्मारक मंडळ चंद्रपूर द्वारा संचालित लोकमान्य टिळक कन्या विद्यालय चंद्रपूर येथे मंडळाचे अध्यक्ष तथा शाळा समितीचे अध्यक्ष ॲड. रवींद्र भागवत यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन कवायती, विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी लोकमान्य टिळक स्मारक मंडळाचे उपाध्यक्ष श्रीपाद मुनगंटीवार उपस्थित होते. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका संध्या बडकेलवार, उपमुख्याध्यापिका अर्चना दुर्गपुरोहीत, पर्यवेक्षिका प्रांजली महादाणी, सेवानिवृत्त शिक्षक चव्हाण सर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांचे हस्ते लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला दीप प्रज्वलित करून माल्यार्पण करण्यात आले. तदनंतर सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत मंडळाचे अध्यक्ष तथा शाळा समितीचे अध्यक्ष ॲड. रवींद्र भागवत




यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लोकमान्य टिळक स्मारक मंडळाचे अध्यक्ष तथा शाळा समितीचे अध्यक्ष ॲड. रवींद्र भागवत हे होते . तर प्रमुख पाहुणे म्हणून मंडळाचे उपाध्यक्ष श्रीपाद मुनगंटीवार हे होते. याप्रसंगी मिडलस्कूल च्या विद्यार्थिनींनी देशभक्तीवर आधारित कवायतीचे सादरीकरण केले. तसेच माध्यमिक विभागाच्या विद्यार्थिनींनी सींदूर ऑपरेशन वर आधारित इव्हेंट चे सादरीकरण केले. तसेच स्वातंत्र्य दिनावर आपापले मनोगत व्यक्त केले. त्यामध्ये आरोही बडी, माहेश्वरी राजकोंडावार, हंसिका खाडीलकर, गुंजन कुंभारे यांनी विचार व्यक्त केले. ऑलम्पियाड स्पर्धेचे उत्कृष्टपणे आयोजन करत असल्यामुळे आयटीओ 'एक्सलेंट अवार्ड' पुरस्काराने गणित व विज्ञान शिक्षक पराग पुण्यपरेड्डीवार सर व त्यांना सहकार्य करणाऱ्या शिक्षिका रेखा गावंडे यांना अध्यक्ष ॲड.रवींद्र भागवत यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी बोलताना ॲड. रवींद्र भागवत यांनी सांगितले की, आपल्या देशात तयार होणाऱ्या वस्तु आपण वापरल्या पाहिजे.

स्वदेशीचा वापर करण्याचे यावेळी आवाहन केले. तसेच आम्ही सगळे एक आहो ही भावना मनात बाळगून देशसेवा करण्याचे ही सांगितले. तसेच टाटा बिल्डिंग इंडिया तर्फे 'आत्मनिर्भर भारत घडविण्यासाठी मी ही पाच कामे करीन' या विषयावर शाळा स्तरावर निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये सिनीयर गटातून प्रथम जान्हवी भांदककर, द्वितीय नेहा चौधरी व तृतीय आर्या उपरे तर ज्युनिअर गटातून प्रथम वेदिका अमरोजवार, द्वितीय रोशनी किरमे तर तृतीय सिध्दी देसाई यांनी बक्षिसे व प्रमाणपत्र पटकाविले. या निबंध स्पर्धेसाठी मुख्याध्यापिका बडकेलवार यांच्या मार्गदर्शनात वडस्कर, भट, व वाघ यांनी सहकार्य केले. याप्रसंगी मंडळाचे उपाध्यक्ष श्रीपाद मुनगंटीवार यांच्या हस्ते प्रमाणपत्र व पदक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थिनींचे व मुख्याध्यापिका बडकेलवार, वडस्कर, भट व वाघ यांना भेट वस्तू देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी सेवानिवृत्त गणित शिक्षक चव्हाण यांनी शाळेतील पाचवी ते दहावीच्या चारही विभागातून सर्वात जास्त गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्याचे वितरण केले. कार्यक्रमाचा शेवट पसायदान जोशी यांनी म्हणून केला. विद्यार्थिनींना चॉकलेट चे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन विशाखा कवाडे यांनी केले तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षिका प्रांजली महादाणी यांनी मानले.

# हिसापाथरड ग्रामस्थांचे आमरण उपोषण मागे

## स्थानिक प्रशासन व काँग्रेस तालुका अध्यक्षांची मध्यस्थी ग्रामपंचायतची विशेष ग्रामसभा

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१७, मुदखेड (नांदेड) :** तालुक्यातील हिसा पाथरड गावच्या गायरान जागे संदर्भात स्वातंत्र दिनाच्या पूर्वसंध्येला सुरू करण्यात आलेले आमरण उपोषण स्थगितीसाठी काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख यांनी मध्यस्थीची भूमिका निभावली असून स्थानिक प्रशासनाने विशेष ग्रामसभा बोलवून गायरान जागेचा प्रश्न निकाली काढण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर तसेच गैरव्यवहार प्रकरणाच्या चौकशीसाठी स्वतंत्र समिती नेमून हेरिंग ठेवण्याचे पंचायत समितीने आश्वासन दिल्यानंतर अखेर चौथ्या दिवशी उपोषण मागे घेण्यात आले आहे.

माधव गोविंद एडके, गोविंद नामदेव लोकरे, सुभाष गिरजाजी बोचरे, करण एडके यांनी ग्रामपंचायत अंतर्गत गावच्या विविध विकास योजनेचा गैरव्यवहार केल्यासंदर्भात तसेच गायरान जागेवरील प्लॉट वाटपात सत्तेचा गैरवापर करून खऱ्या गरजूंना वंचित ठेवले असल्याने संबंधित प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला गाव पातळीवर आमरण उपोषण सुरू केले होते. यानंतर चार दिवसांपासून सुरू असलेल्या अमरण उपोषण सोडविण्यासाठी आजी माजी सरपंचांनी तसेच पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी शेखर देशमुख, विस्तार अधिकारी निलेश बंगाळे यांनी उपोषणकर्त्यांची बाजू समजावून घेऊन चर्चा केली. सकारात्मक चर्चेनंतर तोडगा काढण्याचे आश्वासन संबंधित प्रशासन व स्थानिक प्रशासनाने दिले आहे.

गायरान जागेवरील प्लॉट वाटपासाठी विशेष ग्रामसभा घेण्याचे आश्वासन आमरण उपोषणकर्त्यांना देण्यात आली. पंचायत समितीच्या वतीने ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी विशेष समिती नेमून सत्यता पडताळणीसाठी तक्रारदारासमक्ष हेरिंग ठेवण्याची लेखी पत्र देण्यात आले आहे. सरपंच सरस्वती संभाजी बोचरे, भगवान दशरथ एडके, बळीराम पाटील माजी सरपंच केशवराव बळीराम पाटील बोचरे, माजी सरपंच संभाजी कोंडीबा लोकरे यांनी गायरान जागे संदर्भातील प्लॉट



**गावच्या विविध मागण्यांसाठी ग्रामस्थांच्या वतीने माधव गोविंद एडके यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेले उपोषण लक्षवेधी ठरले आहे. यानंतर या आमरण उपोषणाची दखल संबंधित प्रशासन, स्थानिक प्रशासन यांनी वेळीच दखल घेऊन तोडगा काढण्याचे आश्वासन दिल्यानंतर गावकऱ्यांना तूर्त दिलासा मिळाला असून या प्रकरणातील सत्यता पडताळून गावातील गरजूंना न्याय मिळेल. अशी भावना यावेळी उपोषणकर्त्यांनी व्यक्त केली आहे.**

तक्रारी संदर्भात विशेष ग्रामसभेतून प्रश्न निकाली काढण्याचे आश्वासन दिले आहे.

यानंतर सरपंच सरस्वतीबाई बोचरे, विस्तार अधिकारी निलेश बंगाळे, काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, प्रा.संदीप देशमुख , बालाजी शिंदे नागेलीकर, राजू बोचरे यांच्या हस्ते लिंबू सरबत देऊन आमरण उपोषण सोडविण्यात आले आहे. यावेळी उपोषणकर्त्याची वैद्यकीय तपासणी करून ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

# हनुमान ठोंबरे यांच्या बेमुदत आमरण उपोषणाला यश

## शेवटी कल्याण तहसीलदार यांनी घेतली दखल; सुरू असलेले उपोषण तात्पुरते स्थगित

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१७, कल्याण (ठाणे) :** १५ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १ वाजता तहसीलदार कार्यालय कल्याण येथे बेमुदत आमरण उपोषणाला विद्यमान ग्रामपंचायत खोणी वडवली चे सरपंच हनुमान विष्णू ठोंबरे बसले होते. त्यावेळी हनुमान ठोंबरे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले आमचा लढा हा राजकीय नसून पंचक्रोशीतील नागरिकांना आरोग्य सुविधा मिळवून देण्याकरिता सामाजिक दृष्टिकोनाचा आहे.

ग्रामपंचायत खोणी- वडवली मधील खोणी, वडवली बु, अंतार्ली, पागड्याचा पाडा, धामटण, म्हाडा वसाहत, पलावा सिटी आणि ईतर पंचक्रोशीतील २५ ते ३० गांवे मिळून दोन लाख पेक्षा जास्त नोकसंख्या असलेल्या नागरिकांना आरोग्य सुविधा मिळण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणी करिता मौजे खोणी



येथील मुख्य प्रवेशद्वार जवळील सर्वे क्रमांक १६२ मधील शासकीय जागेतून ३ एकर जागा मिळवण्यासाठी, लोढा बिल्डर यांना ५ सर्वे नंबर ची दिलेली जागा परत करावी, सांडपाणी व्यवस्थापन साठी जागा, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प करिता जागा या मागण्यासाठी हनुमान ठोंबरे यांनी बेमुदत आमरण उपोषण तहसीदार कार्याजवळ कल्याण येथे सुरू केले होते.

बेमुदत आमरण उपोषणाला आमदार राजेश मोरे यांनी सुद्धा उपस्थिती लावली होती. पंचक्रोशीतील नागरिकांनी चांगला प्रतिसाद या उपोषणाला दिला.

शेवटी प्रशासनाला या बेमुदत अमरण उपोषणाची दखल घ्यावीच लागली. हनुमान ठोंबरे यांनी ११ ऑगस्ट २०२५ रोजी निवेदन दिले होते या निवेदनात नमूद मागणी केली होती. पत्र क्रमांक तीन अन्वये मौजे खोणी येथील सर्वे नंबर १६२ प्राथमिक आरोग्य केंद्र जमीन मागणीचा प्रस्तावउपविभागीय अधिकारी कल्याण व जिल्हा अधिकारी कार्यालय ठाणे यास पुढील कारवाही कामी सादर करण्यात आलेला आहे. तसेच मागणी क्रमांक २ बाबत सविस्तर अहवाल शासनास एक आठवड्यात या कार्यालयामार्फत सादर करण्यात येईल तसेच उर्वरीत मागणी क्रमांक ३ व ४ याबाबत जिल्हा परिषद व इतर शासकीय विभागातील यंत्रणाशी समय व साधून त्यावर प्राध्यान्याने कारवाई करण्यात येईल. असे पत्रक कल्याण तहसीलदार सचिन शेजार यांनी १६ ऑगस्ट २०२५ रोजी उपोषण करते हनुमान ठोंबरे यांना देऊन उपोषण मागे घेण्याची विनंती केली.

यावेळी आमदार राजेश मोरे सुद्धा उपस्थित होते. हनुमान ठोंबरे यांच्या या बेमुदत आमरण उपोषणाला यश आले आहे. उपोषण करते हनुमान ठोंबरे यांनी सुरू असलेले उपोषण तात्पुरते स्थगित केले आहे.

# ठाण्यात उद्धव सेना, मनसेचा दहीहंडीत दिसला एकीचा नारा

## जय जवान गोविंदा पथकाने एकदा नाही चक्क 3 वेळा 10 थर लावून एका दिवसात हॅट्रिक मारली



मराठी माणसांच्या मेळाव्यात दोन्ही ठाकरे बंधूंना 'जय जवान दहिहंडी पथक' या पथकाने मराठी माणसांचे आशास्थान म्हणून सलामी दिली होती. याचाच राग धरून काही भैय्यांची तळी उचलणारे गांडूळ वळवळले होते व आकसापोटी त्यांना एका स्पर्धेत प्रवेश नाकारण्याचा नीच राजकारण केले होते. आज पण ठाण्यात एका गोविंदा पथकाने 'त्यांच्या' इथे पहिल्यांदा १० थर लावले, त्या गोविंदा पथकाचे मनापासून अभिनंदन केलेच पाहिजे. परंतु इथेही यांच्या राजकारणाचे गांडूळ वळवळले व या विजयी पथकाचा नामोल्लेख करताना अप्रत्यक्ष जय जवान गोविंदा पथकाला टोला मारला. आज त्याच जय जवान गोविंदा पथकाने एकदा नाही चक्क तीन वेळा १० थर लावून एकाच दिवसात हॅट्रिक मारली व या गांडूळांना माती दाखवली. जय जवान गोविंदा पथकातील सर्व मित्रांचे व त्यांच्या पाठी खंबीरपणे उभा राहणाऱ्या आमच्या अविनाश जाधवांचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. संस्कार व 'संस्कृती' ही वागण्यात असली पाहिजे...... नुसत्या नावात काय आहे ?

**– प्रमोद (राजू) रतन पाटील (महाराष्ट्र नवनिर्माण सेना, माजी आमदार कल्याण ग्रामीण)**

आज दहिहंडीच्या दिवशी ज्याप्रकारचे राजकारण झाले ते खुपच निंदनीय होते. आमदार प्रताप सरनाईक यांनी ज्या प्रकारचे विधान केले होते. ते खुपच वाईट होत.दहिहंडी हा सण एकमेकांना साथ देवुन वर जाण्यासाठी प्रोत्साहन देण्याचा असतो पाय खेचुन खाली पाडण्याचा नसतो. असो साहेबांना नंतर चौफेर टिकेनंतर उपरती झाली. जय जवान गोविंदा पथकाने ही मोठ्या मनाने सणासाठी तिथे जावुन थर लावले. पण मराठी जनतेने मात्र हे सार पाहिलं आणि त्यातून त्यांनी काय बोध घ्यायचा तो घेतलाच. सध्या हा मराठी माणसाच मत लिहलेले हा फोटो सोशल मिडीयावर व्हायरल होत आहे. आपल्याला याबद्दल काय वाटते?

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१६, ठाणे :** दहीहंडीनिमित्त ठाणेकरांना उद्धवसेनेचे माजी खा.राजन विचारे आणि मनसेचे ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांचा एकीचा नारा पाहायला मिळाला. जांभळी नाक्यावरील महा दहीहंडी आणि मनसे दहीहंडी उत्सवाचा आनंद घेतलेल्या ठाणेकरांना या दोन्ही पक्षाच्या नेत्यांमधील मनमिलनाचा सूर एकत्र येणार असल्याचे उघड झाले. जांभळी नाक्यावरील विचारे यांच्या महा दहीहंडी उत्सवाला यंदा १९ वर्षे पूर्ण झाली आहेत.

विचारे म्हणाले की, आमच्या सेनेचे आणि मनसेचे धोरण एकच आहे. एका रक्ताचे नाते, मन जुळणार आहे. महाराष्ट्रात चांगले घडणार असून, जनतेच्या मनातले घडणार आहे. मराठा माणसाचा आवाज आज पुन्हा महाराष्ट्रात घुमणार आहे.

मराठी माणसाच्या म्हणण्यानुसार, दोन्ही भाऊ एकत्र येणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे घडणार असल्याचे अविनाश जाधव यांनी सांगितले. मनसेच्या दहीहंडी मध्ये जय जवान दहीहंडी जोगेश्वरी गोविंदा पथकाने १० थर लावून सलामी दिली. एका दिवसात तीन वेळा १० थर लावून हॅट्रिक त्यांनी पूर्ण केली आहे.

सलग तीन वेळा सलामी देऊन विश्वविक्रम त्यांनी केला आहे जोगेश्वरी पूर्वेला, ठाण्यातील संस्कृती प्रतिष्ठानला १० थरांची सलामी देऊन संपूर्ण देशाचे मने जिकली आहेत. जय जवान गोविंदा पथकाचे प्रशिक्षक संदीप ढवळे आहेत. राजन विचारे निष्ठावंत शिवसैनिक आहेत. त्यांच्या खांद्याला खांदा लावून आम्ही ठाण्यातही एकत्र येऊ. त्यांच्या पक्षनिष्ठमुळे येथे पक्ष आहे. सध्या महाराष्ट्रात मराठी माणूस अडचणीत आला आहे. दोन्हीही नेते कुटुंबासह एकत्र येत असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

अविनाश जाधव यांच्या दहीहंडीला जितेंद्र आव्हाड यांचीही हजेरी लागली. जय जय महाराष्ट्र लाव रे! सगळ्यांनी हात वरती करा, मराठी माणसाची ताकद दाखवा मनसेच्या दहीहंडीत आव्हाड चा दंगा पाहायला मिळाला. मनसेच्या दहीहंडीत असणाऱ्या सर्व गोविंदा पथकांना प्रोत्साहन देत होते. तुम्ही १० थर लावू शकतात असा आत्मविश्वास गोविंदा पथकांना ते देत होते. अविनाश जाधव हे दरवेळी जितेंद्र आव्हाड साहेबांना फोन करून बोलवत असतात. पक्ष बाजूला ठेवा आणि मनसेच्या दहीहंडीला उपस्थिती लावा असे फोनवरून ते जितेंद्र आव्हाड साहेबांना सांगत असतात.

# थोडक्यात

## शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल दिपाली पवार यांना घाटकोपर भूषण पुरस्कार



**अक्षराज : संदीप येवले**

**दि.१६, मुंबई :** घाटकोपर प्रगती मंच या सामाजिक संस्थेच्या वतीने' घाटकोपर भूषण पुरस्कार २०२५' चे आयोजन करण्यात आले होते. १५ ऑगस्ट दिनी परमकेशव बाग सभागृह नवरोजी लेन घाटकोपर पश्चिम येथे हा पुरस्कार सोहळा पार पडला. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्तींना'घाटकोपर भूषण पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. घाटकोपर पश्चिम येथील सरस्वती विद्यामंदिर शाळेच्या संचालिका दिपाली पवार यांनी घाटकोपर विभागात मराठी, इंग्रजी व सेमी इंग्रजी माध्यमातून दर्जेदार शिक्षण सुविधा निर्माण करून विद्यार्थ्यांना भविष्याचा वेध घेण्यासाठी समर्थनीय कामगिरी केल्याबद्दल 'घाटकोपर भूषण' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कला, क्रिडा, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल शिक्षण,मुलींना स्वसंरक्षण प्रशिक्षण, वृक्षारोपण अशा अनेक उपक्रमाने शाळेचा व विद्यार्थ्यांचा आलेख उंचावला आहे. अनेक वर्ष शालेय 'हिंद करंडक चषक' शाळेने मिळविला असून अनेक तायक्वॉदो खेळाडू हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळले आहेत. या सन्मानाबद्दल दिपाली पवार यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांच्याकडुन अभिनंदन होत आहे.

## ७९ वा स्वातंत्र्य दिन रा.फ.नाईक विद्यालयात उत्साहात संपन्न




**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.१५, नवी मुंबई :** आपल्या देशाचा ७९ वा स्वातंत्र्य दिन रा.फ.नाईक विद्यालयात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कल्पना संजीव नाईक यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत, ध्वजगीत, राज्यगीत व समूहगीत सुंदरपणे सादर केले. कब बुलबुल व गाईड्सच्या मुलामुलींच्या पथकांनी शिस्तबद्ध संचलन करून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. संगीताच्या तालावर सामूहिक कवायत विद्यार्थ्यांनी सादर केली. प्राथमिक विभागातील इयत्ता ३ री अ च्या सौम्या नितीन महाडिक आणि इयत्ता १० वी अ च्या सिद्दी तुकाराम गोरे यांनी सुंदर भाषण करून उपस्थितांची मनं जिंकली. नवभारत नवसाक्षरांना प्रमाणपत्र वाटप पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन पर भाषण झाले. शाळेत तिरंग्याच्या रंगात आकर्षक सजावट करण्यात आली होती. त्यात नैसर्गिक पानाफुलांचा वापर करून राष्ट्रीय पक्षी मोराची सुंदर रांगोळी काढण्यात आली होती. आजच्या कार्यक्रम प्रसंगी पाहुण्यांसोबत संस्थेचे पदाधिकारी अदिती नाईक, सदानंद म्हात्रे, प्रशासकीय अधिकारी म्हात्रे, राजश्री यादव, सीमा म्हात्रे, रवींद्र पाटील सर, चारुशीला चौधरी, नसीम कुरणे, सुमती मिस, इलेन मिस, प्रताप महाडीक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग, पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर नशामुक्ती भारत यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर रॅलीस कोपरखैरणे पोलीस चौकीचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी आपल्या टीम सहीत उपस्थित राहून सहभाग दर्शविला. तसेच उपस्थित विद्यार्थी व पालकवर्ग, निपुण भारत मातापालक यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन लांघी यांनी केले. सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

## स्वातंत्र्य दिनानिमित्त काठी येथील विद्यार्थांना वही-खाऊचे वाटप



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१६, पाटण (सातारा) :** भारत ब्रिटीशांच्या सत्तेपासून स्वतंत्र होऊन आज ७८ वर्ष पूर्ण होत असताना आपण ७९ वा स्वातंत्र्य दिन साजरा करत आहोत. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी ब्रिटीशांच्या विरोधात आपल्या पूर्वजांना मोठा संघर्ष करावा लागला. अनेकांना जीवाचे बलिदान द्यावे लागले. स्वातंत्र्य चळवळीतील संघर्षाचा सखोल अभ्यास केला पाहिजे तरच स्वातंत्र्य म्हणजे काय हे प्रत्येकाला समजेल. ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त काठी ता. पाटण येथील जि.प.प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना वही व खाऊ वाटप करताना शिवप्रेमी मनोहर यादव बोलत होते. यावेळी सुंदरगड संवर्धन समितीचे अध्यक्ष धैर्यशील पाटणकर, दिपकसिंह पाटणकर, अनिल भोसले, लक्ष्मण चव्हाण, केंद्र प्रमुख डफळे, शाळेचे मुख्याध्यापक भोसले, काठीचे पोलिस पाटील योगेश कदम, सिताराम जाधव, राम जाधव आदी शिक्षक, ग्रामस्थ उपस्थित होते.मनोहर यादव पुढे म्हणाले, स्वातंत्र्य लढ्याचा काळ मोठा आहे. मुघलांच्या सत्तेपासून स्वराज्याला स्वातंत्र्य देण्यासाठी राजमाता जिजाऊ छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरुवात केली. छत्रपतींनी स्वराज्याचा भगवा झेंडा अटकेपार जावून डौलाने फडकवला. स्वराज्य निर्मिती करुन मराठ्यांचे राज्य स्थापन केले. आज छत्रपतींचा इतिहास देखील आजच्या पिढीला प्रेरणादायी आहे. कालांतराने ब्रिटिश इंग्रजांनी भारतात व्यापारी दृष्टिकोन समोर करुन भारतात घुसखोरी केली. आणि भारतावर राज्य करण्यास सुरुवात केली. त्यांच्या जुलमी अन्यायकारी राजवटीपासून मुक्तता करण्यासाठी महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, लोकमान्य टिळक, दादाभाई नौरोजी, राजाराम मोहन रॉय यांच्यासह आपल्या पूर्वजांचे मोठे योगदान आहे. हे योगदान आपण विसरता कामा नये. असे त्यांनी शेवटी सांगितले. यावेळी दिपकदादा पाटणकर, धैर्यशील पाटणकर यांनी मनोगत व्यक्त केले. मुख्याध्यापक भोसले यांनी सर्वांचे स्वागत केले तर शेवटी आभार योगेश कदम यांनी मानले

## के. रामलू पब्लिक स्कूल येथे चिमुकल्या राधा कृष्णानी साजरी केली गोकुळाष्टमी

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१६, कुंडलवाडी (नांदेड) :** भारतीय परंपरा, संस्कृती आणि भक्तीमय उत्साहात के. रामलू पब्लिक स्कूलने १६ ऑगस्ट रोजी कृष्ण जन्माष्टमी आनंदाने साजरा केली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष साईरेड्डी ठक्करवाड सचिव यशवंत संगमवार संचालिका रमा ठक्करवाड यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. या कार्यक्रमात विद्यार्थी, पालक, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी चिमुकल्यानि राधा कृष्णाची वेशभूषा,नृत्य सादर केले. वृंदावनातील कथांमधील भगवान कृष्ण, राधा, गोपी आणि इतर पात्रांच्या वेशभूषेत लहान मुलांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाची सुरुवात भगवान श्रीकृष्णाच्या आशीर्वादाने प्रार्थना समारंभाने झाली. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाले. ज्यात सामूहिक नृत्य, भजन आणि कृष्णाच्या लीला आणि खोडकर बाजूचे प्रतीक असलेल्या दहीहंडीचे पुनरुज्जीवन करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये पालकांनी समाधान व्यक्त करीत शाळेमध्ये विविध उपक्रमातून मुलांना शिक्षण दिले जाते याबाबत स्तुती केली.